# कर्करोग उपचारासाठी दहा हजारांची मदत : शेतक-यांना लाभ घेण्याचे आवाहन

ता. ११: केवळ शेतीवरच उपजिविका असणा-या शेतकरी कुटुंबातील कर्करोगग्रस्त शेतक-यांना अभियानाकडून १० हजारांची मदत करण्यात येत आहे. ही मदत बळीराजा चेतना अभियान समितीच्या खात्यामध्ये जमा झालेल्या लोकवर्गणी निधीमधून देण्यात येणार आहे. त्यामुळे ‘कर्करोगपिडितांना बळीराजा चेतना अभियानाची मदत’ या योजनेचा लाभ शेतकरी कुटुंबीयांनी घ्यावा. असे आवाहन जिल्हाधिकारी सचिन्द्र प्रताप सिंह यांनी केले आहे.

शेतकरी कुटुंबांसाठी कर्करोगाची समस्या ही गंभीर स्वरूपाची आहे. याच्या उपचारासाठी कुटुंबांना पैशाची तजवीज करावी लागते. यात कुटुंबांचा बराच वेळ जात असून रोगही वाढीस लागतो. उपचारासोबत तपासणी, औषधी, तपासणीकरिता जाण्यासाठी वाहतूक खर्च, रूग्णालयात भरती केल्यानंतर कुटुंबातील इतर व्यक्तींचे भोजन, निवास, तातडीने लागणारे औषधोपचार यावर ब-याच प्रमाणात खर्च होतो. अशा अनेक कारणामुळे शेतकरी कुटुंबांना इतरत्र योग्य उपचार घेता येत नाही. त्यामुळे जिल्हा प्रशासनाकडून राबविण्यात येणा-या बळीराजा चेतना अभियानांतर्गत कर्करोग पिडीत शेतकरी कुटुंबाना १० हजारांची मदत करण्यात येत आहे. ही मदत बळीराजा चेतना अभियान समितीच्या खात्यामध्ये जमा झालेल्या लोकवर्गणी निधीमधून देण्यात येणार आहे. यासाठी अशा शेतकरी कुटुंबीयांनी उपचार सुरू असल्याचे वैद्यकिय अधिका-यांचे तपासणी कागदपत्रे, उपचार सुरू असलेल्या वा उपचारासाठी जात असलेल्या वैद्यकिय अधिका-यांचे नाव, सातबारा, आदी आवश्यक कागपत्रांची माहिती संबंधीत तलसील कार्यालयात द्यावी.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकरी कुटुंबाकडे शिधापत्रिका, शेतीचा ७/१२चा उतारा असावा. त्यामुळे ‘कर्करोगग्रस्तांना बळीराजा चेतना अभियानाची मदत’ या योजनेचा लाभ शेतकरी कुटुंबीयांनी घ्यावा. तसेच आपला मदतीचा प्रस्ताव संबंधीत तहसील कार्यालयात द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सचिन्द्र प्रताप सिंह यांनी केले आहे.

**आतापर्यंत २८५ शेतक-यांना मदत**

योजनेच्या सुरवातीपासून जिल्हयातील 285 शेतक-यांना या योजनेतून लाभ देण्यात आला. यातून या कुटुंबाना 28 लाख 50 हजार रूपयांची आर्थिक मदत करून बळीराजा चेतना अभियान समितीने मोठा आधार दिला आहे.

---------------